बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

G20 भारत 2023 INDIA

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL,
SHIVAJINAGAR, PUNE-5

## वृत्तपत्रीय निवेदन

# अनेक नवीन उपक्रम व सुविधा सुरु करून बँक ऑफ महाराष्ट्रने आपले ग्राहक व कर्मचाऱ्यांसाठी बँकिंग व्यवहार अधिक सोपे केले

**पुणे दिनांक ७ एप्रिल २०२३** : आपल्या ग्राहक व कर्मचाऱ्यांचे बँकिंग व्यवहार अधिक सुलभ व सोयीस्कर करण्यासाठी सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने पुन्हा एकदा नवीन उपक्रम व सुविधा सुरु केल्या आहेत. या उपक्रमांमुळे ग्राहकांना अधिक मूल्यवर्धित, कार्यक्षम व बँकिंग व्यवहार आनंददायक होणाऱ्या अनेक सुविधा आज सुरु केलेल्या नवीन उपक्रमात परिकल्पित आहेत.

"बँक ऑफ महाराष्ट्र एक तारुण्याने मुसमुसलेली चपळ बँक असून काळाबरोबर व बँकेच्या ग्राहकांच्या व अर्थव्यवस्थेच्या बदलत्या गरजांप्रमाणे तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून इच्छित बदल घडविण्याचे या बँकेचे एक उद्दिष्ट आहे. अनेक डिजिटल उपाययोजनांच्या द्वारे आम्ही या प्रवासात अनेक लक्षणीय बदल केले असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी सांगितले. समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही विविध योजना व सेवा समाविष्ट असणारी डिजिटल परिसंस्था निर्माण करण्यासाठी आम्ही अनेक संयुक्तिक उपाययोजना केल्या असल्याचा अभिप्राय श्री राजीव यांनी व्यक्त केला.

सर्वांगीण दृष्टीकोनातून बँकिंग सुलभ व सुगम्य करण्याचे बँकेचे प्राथमिक उद्दिष्ट असल्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे यांनी सांगितले. यामुळे ग्राहकांची गरज सर्वश्रेष्ठ समजून डिजिटल, नाविन्यपूर्ण व सहयोगात्मक उपाययोजना करूनच हे साध्य करता येईल असेही त्यांनी सांगितले. " मनात नुसती इच्छा जरी उत्पन्न झाली तरी त्वरित व विनाविलंब बँकिंग सेवा अविरत उपलब्ध होण्याचे हे दिवस आहेत. तंत्रज्ञानामुळे हे सर्व उद्दिष्टे साध्य करणे शक्य झाले आहे. हाताच्या बोटावर बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस पूर्ण करण्यासाठी आमची वाटचाल सुरूच राहील व त्यासाठी आणखी अनेक योजना व सुविधा पुरवाव्या लागतील" असा अभिप्राय देखील श्री पांडे यांनी व्यक्त केला.

ग्राहकांचे बँकिंग अधिक कार्यक्षम करून बँकेचा डिजिटल प्रवास अधिक सुगम करण्यासाठी बँकेने पुणे ( पुणे पश्चिम, पुणे शहर व पुणे पूर्व ) , बेंगळूरू, कोलकाता, पटना, व चंदिगढ या प्रादेशिक कार्यालयांच्या अखत्यारीत डिजिटल स्वरूपातील व्यक्तिगत कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या योजनेत बँकेचे सद्य ग्राहक रु २०.०० लाखापर्यंत डिजिटल माध्यमातून कोणत्याही तसदीशिवाय कर्ज घेऊ शकतील. याशिवाय आपल्या व्हिसा व रूपे डेबिट कार्ड धारकांसाठी बँकेने अनेक नवीन सुविधा सुरु केल्या आहेत. व्हिसा आंतरराष्ट्रीय डेबिट कार्ड हे नवीन स्वरुपात कोणताही संपर्करहित पद्धतीने भारत व विदेशातील सर्व प्रकारच्या उपकरणावर प्रदान सेवा देऊ करणार असून या सुविधेत सहभागी होण्यासाठी कोणतेही सहभाग शुल्क नाही. हे एक प्रकारचे इलेक्ट्रोनिक पाकीट असून ग्राहक जिथे जिथे रकमा प्रदान करेल तिथे रक्कम ग्राहकाच्या बँक खात्यातून त्वरित वजा होईल. रूपे सिलेक्ट आंतरराष्ट्रीय डेबिट कार्ड देखील संपर्करहित असून विमानतळ, आरोग्य तपासणी इत्यादी लाभ त्यामध्ये समाविष्ट आहेत. रूपे पेट्रो डेबिट कार्डद्वारे आपल्या वाहनात इंधन भरल्यास इंधनाच्या रकमेत बचत होऊ शकेल व सहल व परिवहन व्यावसायिकांना प्रदाने करताना देखील या रोकडरहित कार्डांचा उपयोग अतिशय सुलभतेने व सहजरित्या करता येईल.

असबा, मुद्रा कर्ज, शासकीय योजना, डीमॅट खात्याची माहिती व शंकासमाधान, किसान कोपरा योजने अंतर्गत कृषी कर्ज, सोने तारण कर्ज, मुदत ठेवींच्या व्याजदर दर्शविणारा तक्ता इत्यादी वैशिष्ट्यांमुळे बँकेच्या भ्रमणध्वनी उपायोजनात कमालीची सुधारणा झालेली ग्राहकांना जाणवेल. कर्ज मिळण्यसाठी अर्ज करण्यासाठी व कर्ज खात्याची शिल्लक रक्कम इत्यादी माहिती मिळण्यासाठी बँकेने ( + ९१ ७०६६०३६६४० ) या क्रमांकावर whats अप सेवा देखील सुरु केली आहे.

एका वित्तीय तंत्रज्ञान कंपनीच्या माध्यमातून बँकेने आपले इंटरनेट बँकिंग व्यवहार करण्यासाठी आणखी एक प्रदानाचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. या एकत्रीकरणातून बँकेची इंटरनेट आधारित बँकिंग सेवा वापरणारे ग्राहक सुलभतेने व सुरक्षित पद्धतीने आपली विविध प्रदाने करू शकतील. त्याशिवाय बंकेंच्या निवृत्ती वेतन धारक ग्राहकांनी ९१ – ७९९७७१४०५५ या क्रमांकावर संपर्क साधल्यास त्यांना निवृत्ती वेतनाच्या स्लिपा / प्रमाणपत्रे उपलब्ध होतील.

केंद्र व राज्य शासनाच्यासह अनेक ग्राहकांना बँक व्यापक स्तरावर विविध सेवा देत आहे. बँकेशी एकीकृत केलेली योजना निहाय बँक व्यवस्थापन प्रणालीशी एकीकृत वित्तीय व्यवस्थापन प्रणाली जोडण्यात आली आहे. सद्य स्थितीत बँक पाच राज्यांना ही सेवा पुरवीत असून त्यापैकी दोन राज्य सरकारे अगदी अलीकडे या उपक्रमात सहभागी झाली आहेत. प्रत्येक प्रशासकीय स्तरावर वाटप झालेल्या निधीचे योजना निहाय वितरण व उपयोगाचा सत्कालिक तत्वावर मागोवा घेण्यासाठी व संनियंत्रण ठेवण्यासाठी सदर प्रणालीचे संकल्पन करण्यात आले आहे. यामुळे लाभार्थ्यांना सत्कालिक तत्वावर निधी विमोचीत करण्याचा व त्याचा मागोवा / संनियंत्रण ठेवण्याचा सुलभ मार्ग शासनाच्या विविध अभिकरणाना उपालाभ्द झाला आहे.

बँकेची परिचालन विषयक कार्यक्षमता वाढविण्यासाठी बँकेने अनेक उपाययोजना केल्या आहेत. लोनलीड या सुविधेमुळे बँकेने आपल्या डिजिटल बँकिंग शाखांच्या माध्यमातून प्राप्त केलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना कर्ज देण्याच्या प्रस्तावांची दोषशून्य व प्रभावी छाननी करणे ( ZED प्रमाणित ) व त्यायोगे त्यांना विविध सुविधा देण्याबाबत बँकेला विचार करता येईल. विविध उद्योगांच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्यासाठी बँकेने आपले जोखीम व्यवस्थापन अधिक मजबूत केले असून उद्योग निहाय जोखीम विश्लेषण व संनियंत्रण करणे बँकेला शक्य झाले आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या माहितीवर आधारित बाजारपेठेतील विविध घडामोडींची माहिती देणारी पट्टिका बँकेने विकसित केली असून बँकेचा व्यवसाय, तिचा देशाच्या विविध भौगोलिक भागात शिरकाव व बाजारपेठेतील हिस्सा यामुळे सहज समजून येणार आहे. यामुळे आपली सर्व संसाधने अधिक कार्यक्षम पद्धतीने विविध लक्ष्यीत बाजारपेठात गुंतवणूक करून अधिक लाभ मिळविणे बँकेला शक्य होणार आहे.

आपल्या सर्व निविदांचे केंद्रीभूत संनियंत्रण ठेवण्यासाठी व त्यातील प्रगतीचे सारभूत माहिती मिळण्यासाठी बँकेने **"महा निविदा"** हे बँक अंतर्गत उपयोजन विकसित केले आहे. सुधारित व्याज अंतरनिरासन योजनेच्या अंतर्गत किसान क्रेडीट कार्डाचे कर्जदार व व्याज अंतरनिरासन पात्रतेची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने कार्यान्वित करण्यासाठी बँकेने एक वेगळे संस्थळ सुरु केले आहे.

बँकेचे वाहन कर्ज व्यवसाय वाढविण्यासाठी मारुती सुझुकी कंपनीशी करार केला असून बँकेच्या कर्ज जीवनचक्र व्यवस्थापन आज्ञावलीत अनेक डिजिटल लीड ग्रहण करून कर्ज घेण्यासाठी त्यांचा पाठपुरावा करणे आता बँकेला

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL,
SHIVAJINAGAR, PUNE-5

शक्य होणार आहे.

ग्राहकांना बँकिंग सेवेचा अधिकाधिक आनंद देण्यासाठी बँक वचनबद्ध असून अनेक डिजिटल उपक्रमांचे आयोजन बँक करीत आहे व यापुढेही करीत राहणार आहे.